# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 23 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २३ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- शासकीय कार्यालयं आणि विभागांमध्ये निवड झालेल्या ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना पंतप्रधानांच्या हस्ते आज नियुक्तीपत्रं
- देशाच्या वनं आणि वृक्षाच्छादनात एक हजार ४४५ चौरस किलोमीटरनं वृद्धी
- मतदार संघातल्या महत्त्वपूर्ण योजना आणि कामं मार्गी लावण्याची नवनियुक्त मंत्र्यांची मतदारांना ग्वाही
- बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न सोडवण्याला प्राधान्य-पोलिस अधीक्षक नवनीत काँवत

आणि

- १९ वर्षांखालील मुलींच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत बांग्लादेशला पराभूत करत भारत अजिंक्य

****

शासकीय कार्यालयं आणि विभागांमध्ये निवड झालेल्या ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे नियुक्तीपत्र प्रदान करणार आहेत. यावेळी ते उमेदवारांना संबोधितही करणार आहेत. रोजगार मेळावा हा पंतप्रधानांच्या रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या वचनाची पूर्तता करण्याच्या दिशेनं एक पाऊल आहे. हा उपक्रम युवकांना राष्ट्रनिर्माणाबरोबरच आत्मनिर्भर होण्याची संधी उपलब्ध करून देईल, असं सरकारतर्फे कळवण्यात आलं आहे. हा रोजगार मेळावा देशभरात ४५ ठिकाणी आयोजित केला जाणार असून, यामाध्यमातून केंद्र सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभागांमध्ये भरती केली जात आहे. देशभरातून निवडलेले नवे उमेदवार गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च

शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारखी विविध मंत्रालयं तसंच विभागांमध्ये नियुक्त होतील.

****

देशाच्या वनं आणि वृक्षाच्छादनात, एक हजार ४४५ चौरस किलोमीटरनं वृद्धी झाली आहे. वनं सर्वेक्षण विभागानं २०२३ मधे केलेल्या वन स्थिती पाहणीचा अहवाल, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी प्रसिद्ध केला. सध्या एकूण आठ लाख २७ हजार ३५७ चौरस किलोमीटर क्षेत्र, वन आणि वृक्षाच्छादित असून, ते देशाच्या एकूण भूभागाच्या, २५ पूर्णाक एक दशांश टक्के इतकं असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

छत्तीसगड, उत्तरप्रदेश, ओडीशा आणि राजस्थानात, वनक्षेत्र वेगानं वाढलं असून, मध्यप्रदेश, अरुणाचल प्रदेश आणि महाराष्ट्रात, अद्याप मोठी जंगलं टिकून आहेत. या आधीच्या पाहणीच्या तुलनेत, झाडा झुडुपांच्या स्वरूपातला कार्बन साठा देखील, आठ कोटी १५ लाख टनांनी वाढला असून, तो ७२८ कोटी ५५ लाख टनांच्या आसपास पोहोचला आहे.

****

राज्य विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव महाविकास आघाडीला पचला नाही, म्हणून त्यांनी ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी केली आहे. बारामती इथं काल त्यांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. लोकसभेतल्या निकालाबद्दल महायुतीनं ईव्हीएमला दोष दिला नाही, अशी आठवण त्यांनी करून दिली. बारामतीच्या मतदारांनी एक लाखापेक्षा जास्त मतांच्या फरकानं आपल्याला निवडून दिलं, त्यामुळे आपल्यावरची जबाबदारी वाढली आहे, असं सांगून बारामतीच्या विकासासाठी आपण वचनबद्ध असल्याची ग्वाही अजित पवार यांनी दिली.

****

नागपूर इथं झालेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनानंतर आपापल्या जिल्ह्यात पोहोचलेल्या नवनियुक्त मंत्र्यांनी आपल्या मतदार संघातल्या महत्त्वपूर्ण योजना आणि कामं मार्गी लावण्याची ग्वाही मतदारांना दिली.

सर्व समाजात सलोखा निर्माण होण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचं, औरंगाबाद पश्चिमचे आमदार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलत होते. बीड आणि

परभणी इथं आपण जाणार असून, तिथं घडलेल्या दोन्ही घटनांचा बारकाईने अभ्यास करुन, सत्य परिस्थितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर करणार असल्याचं शिरसाट यांनी सांगितलं.

दरम्यान, औरंगाबाद पूर्व चे आमदार, बहुजन विकास, नवीकरणीय ऊर्जा आणि दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांचं मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर काल प्रथमच छत्रपती संभाजीनगर शहरात आगमन झालं. यावेळी पक्षाच्या वतीने त्यांचं जल्लोषात स्वागत करुन मिरवणूक काढण्यात आली. शहरातल्या क्रांती चौक इथं मिरवणुकीची सांगता होऊन, सावे यांची मिठाईने तुला करण्यात आली.

****

लातूर जिल्ह्यातल्या अहमदपूरचे आमदार सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचं काल अहमदपूर तालुक्यातल्या सांगवी फाटा इथं जिल्हा प्रशासनाच्यावतीने स्वागत करण्यात आलं. पाटील यांनी अहमदपूर तालुक्यातल्या भक्तिस्थळ इथं राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या समाधीचं दर्शन घेतलं, तसंच शहरातल्या महापुरुषांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. राज्य मंत्रिमंडळामध्ये मिळालेली सहकार मंत्री पदाची जबाबदारी महत्त्वाची असून, या माध्यमातून सहकार चळवळीला गती देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं पाटील यांनी सांगितलं.

****

नाशिक जिल्ह्यातल्या सिन्नरचे आमदार कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचं काल नाशिकमध्ये भव्य स्वागत झालं. कांद्यासंदर्भात कायमस्वरूपी धोरण आखण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं.

मालेगाव बाह्यचे आमदार शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचं काल मालेगाव इथं स्वागत झालं. गरीबातल्या गरीब मुलांना चांगलं आणि उत्तम शिक्षण देणं, हेचं आपलं ध्येय असल्याचं मनोगत भुसे यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मभूषण अण्णा हजारे आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासारखे प्रेरणापुरुष आणि समाजपुरुष यांची उपस्थिती प्रेरणादायी असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काल अहिल्यानगर इथं एका खासगी समारंभात ते बोलत होते. यावेळी हिवरे बाजार ग्रामस्थांकडून फडणवीस यांना मानपत्र देण्यात आलं.

**

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल अहिल्यानगर इथं अण्णा हजारे यांना भेटून त्यांचे आशीर्वाद घेतले. मुख्यमंत्र्यांनी जलसंपदा विभागाच्या अतिशय महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी सोपवल्यामुळे कोकणात वाहून जाणारं पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात आणण्याचं स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळाली असल्याचं, विखे पाटील यांनी सांगितलं. कृष्णा खोऱ्यातल्या पाणी प्रश्नाबाबतही निश्चित असं धोरण ठरवावं लागेल, असं त्यांनी नमूद केलं, बिगर सिंचनाचं वाढतं प्रमाण, शेतीच्या पाण्याचे निर्माण होणारे प्रश्न, पाण्याची उधळपट्टी आणि पाणी वितरण व्यवस्थेत सुधारणा, या कामांवर आता लक्ष केंद्रीत करावं लागेल, असं विखे पाटील म्हणाले.

****

बीड जिल्ह्यातले कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न सोडवण्याला आपण प्राधान्य देणार असल्याचं, जिल्ह्यात नव्याने रुजू झालेले पोलिस अधिक्षक नवनित काँवत यांनी म्हटलं आहे. ते काल बीड इथं वार्ताहरांशी बोलत होते. मस्साजोग इथल्या हत्या प्रकरणात गुन्हा दाखल झालेला असून, यासंदर्भातला तपास पूर्ण करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. पोलिसांना सर्व तपासांमध्ये पूर्ण यश मिळावं, तसंच जिल्ह्यातली कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित रहावी, यासाठी नागरिकांनी सहकार्य करावं, असं आवाहन काँवत यांनी यावेळी केलं.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात नेवासा तालुक्यातल्या तरवडी इथं सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांच्या १३९ व्या जयंती निमित्त राज्यस्तरीय पत्रकारिता-साहित्य पुरस्कार काल समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. यावेळी पुणे इथल्या पत्रकार राधेशाम जाधव यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

****

१९ वर्षांखालच्या मुलींच्या आशिया चषक क्रिकेट टी- ट्वेंटी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतानं बांग्लादेशला ४१ धावांनी पराभूत करत विजेतेपद पटकवलं. मलेशियातल्या क्वालालंपूर इथं काल झालेल्या या सामन्यात, भारतानं प्रथम फलंदाजी करत २० षटकांत सात बाद ११७ धावा केल्या. विजेतेपदासाठी ११८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, बांगलादेशचा संघ १८ षटकांत ७६ धावांवर सर्वबाद झाला.

****

भारत आणि वेस्ट इंडिजच्या महिला क्रिकेट संघादरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या काल वडोदरा इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताने २११ धावांनी विजय मिळवला. भारतीय महिलांनी प्रथम फलंदाजी करत निर्धारित षटकात ३१४ धावा केल्या. प्रत्यूत्तरादाखल वेस्ट इंडिजचा संघ १०३ धावांवर सर्वबाद झाला. या मालिकेतला दुसरा सामना उद्या वडोदरा इथं खेळला जाणार आहे.

****

भारत पुढल्या वर्षी कनिष्ठ गट नेमबाजी विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भूषवणार आहे. यात रायफल, पिस्तूल आणि शॉटगन प्रकारात स्पर्धा होतील. गेल्या दशकभरात भारतात आयोजित ही नववी मोठी नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा आहे. यापूर्वी भारतानं आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाच्या सहा स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

****

पुण्यात ७० व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची काल सांगता झाली. काल अखेरच्या दिवशी पंडित संजीव अभ्यंकर यांचं गायन, तर प्रतिभावंत ज्येष्ठ गायिका स्वरयोगिनी प्रभा अत्रे यांना श्रद्धांजली देण्यासाठी त्यांच्या शिष्यवृंदाचं सहगायन सादर झालं. दिवंगत गायक भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांना गेल्या अनेक दशकांपासून साथसंगत करणारे ९७ वर्षांचे माऊली टाकळकर यांचं टाळवादन हा या महोत्सवात कौतुकाचा विषय ठरला.

****

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात पुणे पुस्तक महोत्सवाचाही काल समारोप झाला. या महोत्सवाच्या अनुषंगानं अनेक परिसंवाद, चर्चा आणि सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आले. अनेक विक्रमांचीही नोंद या महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झाली. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त ९७ हजारांहून अधिक पुस्तकांचा वापर करून संविधानाची पुस्तकरूपी प्रतिकृती उभारण्यात आली होती. गेले आठ दिवस सुरू असलेल्या या महोत्सवाला रासिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

****

पालघर जिल्ह्यात वाडा तालुक्यामधल्या खानिवली ग्रामपंचायतीनं प्लास्टिक घनकचरा व्यवस्थापनासाठी एक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. त्यात, गावात

कचरा स्वरुपात पडलेल्या, दुकानांमध्ये पडलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून बॉटल श्रेडर मशीनमधे त्या क्रश केल्या जातात. त्यापासून तयार झालेले फ्लेक्स बाजारात विकून आर्थिक उत्पन्न मिळू शकणार आहे.

✲✲✲✲